

# स्वातंत्र्य दिन

# भाषण क्र. 1



# स्वातंत्र्य दिन- भाषण क्र. 1

नमस्कार,

सन्माननीय अध्यक्ष, मंचावर उपस्थित अतिथी गण, शाळा समितीचे अध्यक्ष, उपस्थित सर्व सदस्य, ग्रामपंचायत सदस्य, आमच्या शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक वर्ग, उपस्थित पालक, आणि माझ्या बाल मित्र-मैत्रिणींनो.

सर्वप्रथम सर्वांना 76 व्या भारतीय स्वातंत्र्य दिनाच्या हार्दिक शुभेच्छा...

मी ………..  आज आपल्याला या भारतीय स्वातंत्र्य दिनानिमित्त दोन शब्द सांगणार आहे ते आपण शांत पणे  ऐकावे अशी नम्र विनंती…

15 ऑगस्ट 1947 रोजी आपला भारत देश स्वतंत्र झाला. या आधी जवळपास दीडशे वर्ष ब्रिटिशांनी आपल्या भारतावर राज्य केले.  या देशाचे मूळ मालक हे भारतीय  नागरिक असूनही  ब्रिटिशांनी भारतीयांना पशूप्रमाणे वागणूक दिली.  याच वागणुकीला कंटाळून  महात्मा गांधी,  सुभाष चंद्र बोस,  पंडित जवाहरलाल नेहरू,  लाला लजपत राय  यांच्यासारख्या अनेकांनी  मोठा लढा उभारून  भारतीयांना स्वातंत्र्य मिळवून देण्यास जिवाचे रान केले.

आणि त्यामुळेच आपला देश ब्रिटिशांच्या ताब्यातून मुक्त झाला.  म्हणूनच आपण आजचा

हा  15 ऑगस्ट चा दिवस  दरवर्षी भारतीय स्वातंत्र्य दिन म्हणून साजरा करतो.

एवढे बोलून मी माझे दोन शब्द संपवतो.

**जय हिंद जय भारत!**